## सावंतवाडी-दोडामार्ग हरित परिसराचा वाद

# दहा वर्षे उलटली तरी चर्चाच करणार का?

## उच्च न्यायालयाचे राज्य सरकारवर ताशेरे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : सावंतवाडी-दोडामार्ग वन्यजीव परिसर हा पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र जाहीर करण्याचा निर्णय घेण्याबाबत आदेश देऊन दहा वर्षे उलटली तरी राज्य सरकार या प्रकरणी अद्याप चर्चाच करत आहे. यासाठी सरकारला आणखी किती वेळ हवा आहे, अशा शब्दांत उच्च न्यायालयाने शुक्रवारी राज्य सरकारच्या उदासीन भूमिकेवर ताशेरे ओढले. तसेच या प्रकरणी सरकारने आता तरी अंतिम निर्णय घ्यावा, असे आदेश दिले.

### अधिकाराविना शिक्षणमंत्र्यांकडून बैठक?

पर्यावरणाशी संबंधित प्रकरण असतानाही शिक्षणमंत्र्यांनी या प्रकरणी नुकतीच बैठक घेतली. तसेच या बैठकीत त्यांनी संरक्षित क्षेत्रात समाविष्ट केली जाणारी ३० ते ४० गावे वगळल्याचे आदेश दिल्याचा आरोप याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आला.

हा परिसर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील जाहीर करण्यास पात्र असल्याची माहिती राज्य सरकार आणि केंद्र सरकारने दिली होती. त्याआधारे न्यायालयाने या प्रकरणी अंतिम निर्णय घेण्याचा आदेश २०१३ मध्ये दिला होता. परंतु काही त्रुटी आढळल्याने निर्णय होऊ शकलेला नाही. असे असले तरी अंतिम निर्णयासाठी बैठका घेऊन चर्चा करण्यात येत आहे. लवकरच या प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले. परंतु न्यायालयाने आदेश देऊन दहा वर्षे उलटली तरी सरकार अद्याप चर्चाच करत असल्याचे सांगण्यात आल्याने प्रभारी मुख्य न्यायमूर्ती संजय गंगापूरवाला आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी नाराजी व्यक्त केली.

'सावंतवाडी-दोडामार्ग वन्यजीव परिसर' पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील म्हणून जाहीर करण्याच्या मागणीसाठी वनशक्ती या संस्थेने वकील झमन अली यांच्यामार्फत याचिका केली आहे.